वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कक्ष १४,
आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई.

:: वार्तापत्र:: दिनांक ०६/०७/२०२४

**मुंबईतील १४७ गुंतवणूकदारांना जी. व्ही. आर. एक्सपोर्टस् ॲण्ड इम्पोर्टस् या कंपनीच्या उद्योगामध्ये मुदत ठेवीच्या रक्कमेवर ७ ते १० टक्के व्याजासह परतावा देण्याचे आमिष दाखवून त्यांचेकडून एकूण रु. १७,९४,७५,०००/– स्विकारुन त्यांना व्याजाचा परतावा तसेच मुळ रक्कम परत न करता विश्वासघात करुन गुंतविलेल्या रक्कमेचा अप्रामाणिकपणे अपहार करणारा व मागील १ वर्षापासून फरार असणारा आरोपी वेंकटरमनन गोपालन यास अटक**

मे. जी. व्ही. आर. एक्सपोर्टस् ॲण्ड इम्पोर्टस् या कंपनीचा प्रोप्रायटर वेंकटरमनन गोपालन, वय–५६ वर्षे, रा.ठि.– ५, इमायम अपार्टमेंट, १५ वा रस्ता, अशोक नगर, चेन्नई, तामिळनाडू या कंपनीचा उद्योग चेन्नई येथे आहे. शेतमालाची आयात व निर्यात करण्याचा उद्योग असल्याची बतावणी केली. उद्योगाच्या वाढीसाठी मोठया प्रमाणावर कंपनीमध्ये गुंतवणुक आवश्यक होती आणि सदर गुंतवणुकीच्या मुदत ठेवी रक्कमेवर मासिक ७ ते १० टक्के व्याजासह परतावा देण्याच्या योजना आखून गुंतवणुकदारांना गुंतवणुकीवर मोठया रक्कमेच्या परताव्याचे प्रलोभन दाखवून गुंतवणुक करण्यास भाग पाडले.

माहे डिसेंबर–२०२१ ते मार्च–२०२३ या कालावधीमध्ये फिर्यादीसह इतर १४६ गुंतवणूकदारांना अटक आरोपी नामे वेंकटरमनन गोपालन याने जी. व्ही. आर. एक्सपोर्टस ॲण्ड इम्पोर्टस् कंपनीचे दलखानिया हाऊस, तिसरा माळा, वाकोला सांताक्रुज (पुर्व), मुंबई येथे भाडयाने कार्यालय उघडले आणि कंपनीच्या उद्योगामध्ये विविध कालावधीच्या मुदत ठेवीच्या रक्कमेवर ७ ते १० टक्के मासिक व्याजासह परतावा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी व साक्षिदारांकडून एकूण रु. १७,९४,७५,०००/– स्विकारले व व्याजासह मुळ रक्कम परत न करता, विश्वासघात करुन गुंतविलेल्या रक्कमेचा अप्रामाणिकपणे अपहार करुन फसवणूक करून पळून गेला म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी

Scanned with CamScanner

वेंकटरमनन गोपालन याचे विरुध्द दिनांक ०७/०७/२०२३ रोजी आ.गु.वि.,मुंबई गु.नो.क्र. २९/२०२३, कलम ४०९, ४२० भा.दं.वि. सह ३ व ४ एमपीआयडी कायदा अन्वये गुन्हा दाखल केला. सदरचा गुन्हा केल्यानंतर गेल्या एक वर्षापासून आरोपी फरार होऊन स्वत:चे अस्तित्व लपविण्यासाठी वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत होता त्यामुळे आरोपीस अटक करणे जिकरीचे झाले होते.

आर्थिक गुन्हे कक्ष–१४ विभागातील तपासी अधिकारी पो.नि. संजय लोंढे, पो.उप.नि. मनोज कदम, पो.ह. नलावडे व पो.ह. आव्हाड यांचे पथकाने तिरूपती, आंध्रप्रदेश येथे २ ते ३ दिवस सापळा रचून अत्यंत शिताफिने गुन्हयातील आरोपी नामे वेंकटरमनन गोपालन यांस नमुद गुन्हयात दिनांक ०३/०७/२०२४ रोजी अटक केली आहे. आरोपीस मा. न्यायालयाने दिनांक ११/०७/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड दिलेली आहे. सदर आरोपीच्या अटकेची कारवाई मा.पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे विभाग मुंबई श्री.निशिथ मिश्र, मा. पोलीस उप आयुक्त श्री. संग्रामसिंह निशाणदार, सहा.पो.आयुक्त श्री. गोकुळसिंग पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश बागल यांचे मार्गदर्शनाखाली केली आहे.

अटक आरोपी पोलीस कोठडी रिमांडमध्ये असून तपासी अधिकारी हे गुन्हयातील गुंतवणुकदारांच्या गुंतवणुकीच्या रक्कमेचा विनियोग कशा प्रकारे केला आणि त्याचे साथीदारांबाबत सखोल तपास करीत आहेत. गुंतवणुकदारांची गुंतवणुकीची रक्कम हस्तगत करण्याच्या दृष्टीने तपास चालू आहे.

:::::::